स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद





रयत शिक्षण संस्थेचे,

# राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर.

# प्रतिबिंब

सप्टेंबर २०१७ ते नोव्हेंबर २०१७

विद्यार्थिनी संचलित वार्तापत्र...

[ वर्ष पहिले : अंक : २ ]

### संपादक मंडळ

१. कु.मिसाळ प्रगती सुभाष (S.Y.B.A.)
२. कु.खाडे गीतांजली चंद्रकांत (S.Y.B.A.)
३. कु.खेत्रे अर्चना अर्जुन (T.Y.B.Com.)
४. कु.शिंदे नेहा राजाराम (T.Y.B.B.A.C.A.)
५. कु.पवार मोनाली संजय (S.Y.BSc.)
६. कु.लांडे पूनम अशोक (M.Sc.II)



### मार्गदर्शन

१. डॉ. औटी बी.के
२. डॉ. नगरकर एस.पी.
३. डॉ. करांडे एम.बी
४. डॉ. निकाळजे बी.एस

## संपादकीय...

कु.खाडे गीतांजली चंद्रकांत

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी वर्षोनुवर्षे चालत आलेल्या असमानता, अज्ञान, उपेक्षा यांना छेद देण्यासाठी व शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यापर्यंत पोहचावी म्हणून रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीरांनी लावलेल्या 'रयतेचा' वटवृक्ष दिवसेंदिवस बहरत चाललाय. शतक पूर्ण होण्याआधीच 'रयत शिक्षण संस्थेने' आशिया खंडात अग्रस्थानी राहून कर्मवीरांचा वारसा पुढे चालतो आहे, हे सिद्ध केले. रयतेचा विद्यार्थी समाजामध्ये स्वाभीमानाने पुढे जात आहे कारण भाऊरावांनी दिलेले स्वावलंबी शिक्षणाचे ब्रीद त्याने आत्मसात केले आहे.

कमवा व शिका, एन. एस. एस, विविध शॉर्ट टर्म कोर्सच्या माध्यमातून स्वालंबनाचे धडे तर गिरवलेच त्याचबरोबर जीवनामध्ये यशाला गवसणी घालण्यासाठी 'स्पर्धा परीक्षाच्या' माध्यमातून प्रयत्न करत आहेत. महाविद्यालयात होणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे, कार्यक्रमांमधून, ग्रंथालयातील दर्जेदार पुस्तके वाचून आम्ही जीवनाकडे नकळत गांभीर्याने पाहत गेलो व आई - वडिलांची, समाजाची व देशाची सेवा आपल्या हातून घडावी अशी उर्मी आमच्यामध्ये निर्माण होत गेली.

राधाबाई काळे महिला महाविद्यालय आमच्यासाठी एक ज्ञानमंदिर आहे. जेथे आम्ही घडत आहोत. 'स्व.शंकररावजी काळे साहेब' यांनी त्यांच्या आईच्या स्मरणार्थ केलेली काव्यरचना वाचून कळते, राधाबाईंचा त्याग व मुलाचे आईवरील प्रेमाने समाजातील माझ्यासारख्या मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळत आहे. अकरावी ते पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण आम्हांस येथे मिळत आहे. नोकरीच्या विविध संधीचे मार्गदर्शन , रोजगार उपलब्ध करून देण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न, वर्तमानपत्रे, इंटरनेट, स्पर्धा परीक्षा पुस्तके, विविध मासिके हे आम्हास उपलब्ध होत आहे. त्यामधून ज्ञानाच्या कक्षा वाढत आहेत. ग्रंथालयाच्या अभ्यासिकेत अभ्यास करत असताना भविष्याची बांधणी करत आहोत.

अभ्यासा बरोबरच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, हिमोग्लोबीन तपासणी, विविध शिबिरे तसेच आरोग्य विषयक जागृतीद्वारा मन, बुद्धी व शरीर सक्षम करणाच्या प्रयत्न महाविद्यालयातून होत आहे आमच्या जडणघडणीत निसर्गरम्य महाविद्यालयाचा परिसर व माझे प्राचार्य डी.डी.पाटील यांच्या मार्गदर्शनातून आम्हास ऊर्जा मिळत असते. त्यांच्या वाणीतून निघणारा प्रत्येक शब्द आम्हांस साने गुरुजींची आठवण करून देत असतो. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासूनचा प्रवास खूप थोडा वाटतो परंतु खूप काही आम्ही शिकत गेलो. या संपूर्ण वाटचालीमध्ये 'रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आज घडतो आहे.'

## मा.शरदचंद्रजी पवार यांच्या उपस्थितीत कर्मवीरांचा जयंती सोहळा




पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 130 व्या जयंती सोहळ्याचा कार्यक्रम रविवारी (ता.24)रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.या वेळी महाविद्यालयाच्या नवीन प्रयोगशाळा व प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन मा.शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेने महिलांना सक्षम करण्यासाठी शैक्षणिक सुविधा पुरविणारी चार महाविद्यालये पवार साहेबांच्या पुढाकाराने सुरु झाली. येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालय (कै.) शंकरराव काळे यांच्या प्रयत्नातून स्थापन झाले. त्यासाठी जागेचा पवार साहेबांनी संरक्षणमंत्री असताना सोडविला.या इमारतीचे भूमिपूजनही त्यांच्याच हस्ते झाले आहे.

या महाविद्यालयाची आज दोन स्वतंत्र वसतिगृहे, सुसज्ज व भव्य इमारत, अतिथीगृह, स्वतंत्र ग्रंथालय इमारत आहे. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरुण कडू, अॅड. भगीरथ शिंदे, सचिव माजी प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, आमदार अरुण जगताप, उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे अध्यक्ष दादा कळमकर, आमदार संग्राम जगताप, जनरल बॉडी सदस्य अशोक काळे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष आशुतोष काळे, आमदार वैभव पिचड, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बबनराव पाचपुते, मीनाताई जगधने, राजेंद्र फाळके प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील आदी उपस्थित होते.



उद्घाटन करतांना मा.शरदचंद्रजी पवार, डॉ.अनिल पाटील, मा.आशुतोष काळे, मा.दादाभाऊ कळमकर

## राजकीय कारकिर्दीची पायाभरणी नगरमधूनच

रयत शिक्षण संस्थेच्या लोणी प्रवरा येथील शाळेत नववीचे शिक्षण घेतले. त्या वर्षात केलेल्या आंदोलनांच्या उद्योगामुळे आई - वडिलांनी पुन्हा बारामतीला नेले. तेथे व नंतर पुण्यातील महाविद्यालयात शिक्षण झाले व नंतर राजकीय क्षेत्रात प्रवेश झाला. तथापि, राजकीय कारकिर्दीची पायाभरणी रयतच्या नगरमधील विद्यालयातून झाली. असे संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज सांगितले.

रयतच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा 130 व्या जयंती सोहळा, तसेच प्रयोगशाळा व प्रशासकीय इमारतीचा उद्घाटन सोहळा पवार यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत चे चेअरमन डॉ. अनिल पाटील होते.

विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार अशोक काळे, आमदार अरुण जगताप, आमदार संग्राम जगताप, ज्येष्ठ नेते अंकुश काकडे, रयतच्या मॅनेजींग कौन्सिलच्या सदस्य मीनाताई जराधने, सचिव डॉ.भाऊसाहेब कराळे आदी व्यासपीठावर होते.

पवार म्हणाले, "जिल्ह्यासह राज्यातील रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात दिवंगत नेते शंकरराव काळे यांचे मोठे योगदान आहे. हिराबाई भापकर यांनी त्यासाठी मोठी मदत केली. दादा पाटील राजळे यांच्यासह अनेक दिग्गजांनी कर्मवीरांना साथ दिल्याने शिक्षणाची ज्योत पेटली. त्यातही मुलींच्या शिक्षणासाठी काळे यांचा जास्त आग्रह असल्याने, नगरला ही संस्था उभी राहिली. शिक्षणात नव्या बदलांचा वेध घ्यावा लागेल. त्यातही कौशल्याधारित अभ्यासक्रम शिकविण्यात रयतचे धोरण ठरले आहे. चाकोरीबाहेर जाऊन अत्याधुनिक ज्ञानाची गरज निर्माण झाल्याने हे बदल स्वीकारावे लागतील."

डॉ. पाटील यांनी भाषणात "रयतच्या शिक्षण विस्ताराचा आलेख मांडला. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या 20 मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. विखे पाटील म्हणाले, सरकार आता व्यावसायाभिमुख, तसेच कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम शिकविण्याचा प्रचार प्रसार करते. ही योजना कर्मवीरांनी रयतची स्थापना झाल्यापासूनच मांडली आहे. शिक्षण क्षेत्रातील नवे बदल प्रगतीकडे घेऊन जाणारे ठरतील, म्हणून ते सर्वांनीच स्वीकारण्याची गरज आहे."

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयातील उपक्रमांचा आढावा घेत नव्या गरजाही मांडल्या.

कु.माधवी लगड या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष आशुतोष काळे यांनी स्वागत केले. प्रा.डॉ.संजय नगरकर व प्रा. वृषाली दिघे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब औटी यांनी आभार मानले.

## माई विशेषांकाचा विद्यापीठाकडून गौरव



पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन करमळकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारतांना प्रा.डॉ.दिनानाथ पाटील

येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या माई या वार्षिक विशेषांकाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठ पातळीवर द्वितीय क्रमांक देऊन गौरविण्यात आले.

विद्यापीठात झालेल्या सोहळ्यात कुलगुरु डॉ.नितीन करमळकर, अधिष्ठाता डॉ. शाळिग्राम, परीक्षा संचालक डॉ.अशोक चव्हाण व विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.प्रभाकर देसाई यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीनानाथ पाटील, प्रमुख संपादक डॉ. संजय नगरकर, प्रा.नासिर सय्यद व डॉ. हेमंत अकोलकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

'माई' या अंकातील विद्यार्थिनींच्या सृजनशील व वैचारिक लेखनासह महाविद्यालयाच्या सर्वांगीण उपक्रमांचा लेखाजोखा, छायाचित्रे, सुबक पृष्ठमांडणी हे निकष लक्षात घेऊन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. दुष्काळ, जलव्यवस्थापन, शेतकरी आत्महत्या, स्त्री-भ्रूणहत्या, भ्रष्टाचार, समाजसुधारकांचे कार्य, ग्रंथपरीक्षण आदी विषयांचा या अंकात समावेश आहे. विद्यार्थी वर्ग व साहित्य क्षेत्रात हा अंक वाचनीय ठरला असून, महाविद्यालयाच्या 28 वर्षांच्या इतिहासात या अंकाला प्रथमच सर्वोच्च पुरस्कार मिळाला असल्याचे प्राचार्य डॉ.दीनानाथ पाटील व संपादक डॉ. संजय नगरकर यांनी सांगितले.

## राधाबाई काळेत विविध शिबिरे

येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व अर्पण ब्लड बँकेच्या वतीने हिमोग्लोबिन तपासणी शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 270 विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. 30 विद्यार्थिनींनी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदविला. शिबिराचे उद्घाटन






हिमोग्लोबीन तपासनी करतांना विद्यार्थिनी कु.क्रांती बारस्कर व अन्य विद्यार्थिनी

प्राचार्य डॉ.दीनानाथ पाटील यांनी केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी प्रा.सहदेव आव्हाड, डॉ.संगीता कुलकर्णी, डॉ.संजय नगरकर, प्रा.शुभांगी ठुबे, कु.शामल शिंदे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा.बुवासाहेब ढेरे, प्रा.संजय पाटील, प्रा.अमोल बुचुडे, प्रा.योगेश तंवर उपस्थित होते. ब्लड बँकेच्या भाग्यश्री पवार, गणेश फसले यांनी मार्गदर्शनाद्वारे प्रबोधन केले.

## महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचा रयत शिक्षण संस्थेच्या विविध स्पर्धांमध्ये सहभाग

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी आयोजित केलेल्या विविध स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी प्रभावी सहभाग नोंदविला आहे. यशवंतराव चव्हाण इंस्टिट्युट ऑफ सायन्स येथे झालेल्या 'प्रश्न मंजुषा स्पर्धेत' कु.शामल शिंदे व करिश्मा पटेल यांनी चमकदार कामगिरी नोंदविली दोन फेऱ्या पार पाडुन उपांत्यपुर्व फेरी पर्यंत मजल मारली तसेच छत्रपती शिवाजी महाविद्यालयात झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत कु.प्रगती मिसाळ ही विद्यार्थीनी सहभागी झाली होती.

## राधाबाई काळे महाविद्यालयात प्रदूषणमुक्त दिवाळीची शपथ





प्रदुषणमुक्त दिवाळीचे पथनाट्य सादर करतांना विद्यार्थिनी

राधाबाई काळे महिला महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून वाचन प्रेरणा दिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्त वाचन प्रेरणा दिन या विषयावर परिसंवाद झाला. परिसंवादात प्रा.डॉ. संजय नगरकर, प्रा. सचिन कोतकर, प्रा.गफूर शेख, उपप्राचार्य डॉ.भाऊसाहेब औटी, तसेच विद्यार्थिनी प्रियंका कराळे, प्रगती मिसाळ, गितांजली खाडे, प्राची कुसळे, विक्रांती सोनवणे, भारती झिने, किरण सहाणी, शामल शिंदे, पूजा चौधरी यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील यांनी वाचनाचे महत्त्व व दिवाळीसारख्या उत्सवी सणसमारंभावेळी पाळावयाच्या विवेकावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रदूषणमुक्त दिवाळी या विषयावर पथनाट्य सादर केले. अखेर सामूहिक वाचन व पुस्तक परीक्षणाने प्रेरणादिनाचा समारोप करण्यात आला. प्रा. रामचंद्र राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. संजय नगरकर, प्रा. सहदेव आव्हाड, प्रा. योगेश तवर, प्रा. शुभांगी ठुबे, प्रा. कोतकर व प्रा. राऊत यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आईचे अधुरे स्वप्न मुलीने साकारावे

### ज्योती रेळेकर, राधाबाई मधील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे पालकांशी संवाद

दहावीत असताना लहानपणीच लग्न झाले. त्यामुळे इच्छा असूनही त्या काळी शिक्षण पूर्ण करता आले नाही किंवा अधिकारी होण्याचे स्वप्नदेखील बघता आले नाही. चूल आणि मूल अशी परंपरा असलेल्या काळात इच्छा अपूर्ण राहिल्या. तथापि, माझ्या मुलीने त्या इच्छा पूर्ण कराव्यात आणि स्वप्ने साकारावीत अशीच अतीव इच्छा आहे. माझ्या कन्येने अधिकारी होण्याचे स्वप्न जरूर पूर्ण करावे. राधाबाई काळे महिला महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या संधीचे त्यांनी सोने करावे. अशी अपेक्षा पालक ज्योती रेळेकर यांनी व्यक्त केली.

रयत शिक्षण संस्थेच्या नगरमधील राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व अभ्यास केंद्रातर्फे आज पालकांशी संवाद करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. प्राचार्य दीनानाथ पाटील, मंजूषा माळवदे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब औटी, विभागप्रमुख प्रा. किसन पायमोडे, केंद्र संचालक डॉ. संजय नगरकर, प्रा. अनिल कापरे, सचिन कोतकर, डॉ. हेमंत अकोलकर आदी या वेळी उपस्थित होते.

रेळेकर म्हणाल्या नव्या पिढीतील मुली खूपच नशीबवान आहेत. त्यात राधाबाई काळे महिला महाविद्यालयात उपलब्ध झालेल्या अभ्यास केंद्रातून शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमामुळे त्यांना अधिकारी होण्याची चांगली संधी उपलब्ध झाली आहे. त्याचा फायदा घेऊन मुलींनी पालकांची स्वप्ने साकारावीत.

प्राचार्य डॉ.पाटील यांनी शैक्षणिक उपक्रमांचा आढावा सादर केला, तसेच नव्या उपक्रमांची माहिती दिली. लष्करी सेवेत जाऊ इच्छिणाऱ्या मुलींसाठीही महाविद्यालयात लवकरच मार्गदर्शन केंद्र सुरु होईल, असे ते म्हणाले. स्वागत व प्रास्ताविक केंद्र संचालक डॉ. संजय नगरकर यांनी केले. कु.शामल शिंदे यांनी आभार मानले.

## राष्ट्रीय एकात्मतेसाठी हिंदी साहित्य महत्त्वाचे : मा.प्रि.विश्वास काळे





हिंदी भित्तीपत्रकाचे विमोचन करतांना मा.प्रि.विश्वासराव काळे व प्राचार्य.डॉ.दिनानाथ पाटील

हिंदी भाषेने राष्ट्राला जोडण्याचे काम केले आहे. हिंदी साहित्य विशाल आहे त्यामध्ये कबीर, तुलसीदास, सुरदास, प्रेमचंद , महादेवी वर्मा, जयशंकर प्रसाद यांनी आपल्या साहित्यामधूनच मानवातवादी दृष्टिकोन समाजामध्ये रूजवण्याचा प्रयत्न केला व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश त्यांनी समाजाला दिला. महाविद्यालयामध्ये हिंदी दिनाच्या निमित्ताने मा.प्रा.विश्वास काळे हे बोलत होते. 14 सप्टेंबर ते 28 सप्टेंबर 'हिंदी पंधरवाडा' हा महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला या प्रसंगी

हिंदी विभागा अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व यशस्वी विद्यार्थिनींना पर्यावरण जाणीव जागृतीसाठी एक वृक्ष देण्यात आला व त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी ही त्या विद्यार्थिनीस दिली. वेगवेगळ्या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थिनी.

### पोस्टर प्रस्तुतीकरण

1. प्रथम कु.शिरसाठ नेहा (एम.ए.1 हिंदी)
2. द्वितीय सय्यद अंजुम (एम.ए.1 हिंदी)
3. तृतील कराळे आश्विनी (एम.ए.1 हिंदी)
4. उत्तेजनार्थ कु.लुंगाटे वैभवी (11 वी विज्ञान)

### काव्यवाचन स्पर्धा

1. प्रथम शेख झिनत (टी.वाय.बी.कॉम.)
2. द्वितीय कु.जरे अश्विनी (एस.वय.बी.ए.)
3. तृतीय शेख फरीन (टी.वाय.बी.ए.)

### उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा

1. प्रथम शेख फरीन (टी.वाय.बी.ए.)
2. द्वितीय ढवळे तृप्ती (12 वी विज्ञान)
3. तृतीय खामकर वैशाली (एस.वाय.बी.कॉम.)

### हस्ताक्षर स्पर्धा

1. प्रथम गौड प्रतिभा (12 वी विज्ञान)
2. द्वितीय गौड शितल (एस.वाय.बी.ए.)
3. तृतीय थोरात स्मिता (एस.वाय.बी.ए.)
4. उत्तेजनार्थ सोनवणे प्रतीक्षा (12 वी विज्ञान)

### निबंध स्पर्धा

1. प्रथम घोडके सोनाली (एम.एससी.1)
2. द्वितीय थोपटे रोहिणी (एस.वाय.बी.ए.)
3. तृतीय तिवारी प्रतिभा (12 वी कॉमर्स)

'रचना' हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व पोस्टर प्रदर्शन आयोजन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थिनींनी हिंदी साहित्य व भाषेसंदर्भातील विविध पोस्टर बनविले होते व हिंदी दिवसाच्या निमित्ताने विभागातील माजी विद्यार्थीनी कु.प्रियंका गायकवाड व कु.सोनाली चाबुकस्वार यांनी ग्रंथालयास ग्रंथ भेट दिली विभागांतील अध्यापकांनी महारिद्यालयास ग्रंथ भेट दिली व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील यांनी यावेळी हिंदी भाषेचे महत्त्व विद्यार्थिनीस सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.निकाळजे बी.एस. यांनी केले व आभार प्रा.योगेश तवर यांनी मानले. व प्रा.फातेमा आंबेकर यांचे सहकार्य लाभले.

## कर्मवीर जयंती सप्ताह निमित्त स्पर्धा

वाङ्मय मंडळा अंतर्गत कर्मवीर जयंती सप्ताहाचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले यावेळी विद्यार्थीनींसाठी विविध स्पर्धेचे नियोजन केले व विद्यार्थीनींनी उत्तम प्रतिसाद दिला. त्या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील यांनी केले.

### काव्यवाचन स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| 1) कु.भवर पल्लवी एकनाथ | टी.वाय.बी.एस्सी | प्रथम |
| 2) कु.मिसाळ प्रगती एकनाथ | एस.वाय.बी.ए. | व्दितीय |
| 3) कु.शेख फरियान रियाज | टी.वाय.बी.ए | तृतीय |

### वादविवाद स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| 1) कु. भोसले अश्विनी बबन | एफ.वाय.बी.एस्सी | प्रथम |
| 2) कु. खामकर वैशाली भिमराज | एस.वाय.बी.कॉम. | व्दितीय |
| 3) कु. गांधले प्रतीक्षा सोन्याबापू | एस.वाय.बी.ए. | तृतीय |

### वक्तृत्व स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| 1)कु.जगताप रोहणी एकनाथ | टी.वाय.बी.एस्सी | प्रथम |
| 2)कु. ठवरे स्वप्नाली रमेश | एफ.वाय.बी.एस्सी. | व्दितीय |
| 3)कु.शिंदे शामल शशिकांत | एस.वाय.बी.एस्सी. | तृतीय |

### निबंध स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| 1) कु.फसले प्रतीक्षा अनिल | एस.वाय.बी.एस्सी. | प्रथम |
| 2) कु.लांभाते भारती पंकज | एस.वाय.बी.ए. | प्रथम |
| 3) कु.शिंदे शामल शशिखांत | एफ.वाय.बी.ए. | व्दितीय |
| 4) कु.ससे शुभांगी सहदेव | एफ.वाय.बी.ए. | तृतीय |
| 5) कु.नवले स्वाती बाळासाहेब | टी.वाय.बी.एस्सी | उत्तेजनार्थ |

या स्पर्धा यशस्वीसाठी डॉ. करांडे एम. बी, डॉ. संजय नगरकर, डॉ. निकाळजे बी. एस. यांनी कामकाज पाहिले.

## 'कारभारणी' मधून दुर्लक्षित महिलांना न्याय



मीनाताई जगधने यांच्या हस्ते अॅड. डॉ. बाळ ज. बोठे पाटील लिखित पुस्तकांचा शानदार प्रकाशन सोहळा

'कारभारणी' या पुस्तकाने समाजातील वेगळ्या वाटेने जाणाऱ्या दुर्लक्षित परंतु प्रेरणादायी महिलांना न्याय मिळाला ज्या नेहमी पडद्यामागची भूमिका बजवायच्या त्यांना समाजासमोर आणण्याचे काम या 'कारभारणी' द्वारे झाले असे गौरवोद्‌गार रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्य मीनाताई जगधने यांनी आज काढले.

राधाबाई काळे महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या शानदार सोहळ्यात आज 'कारभारणी' या पुस्तकाचे प्रकाशन जगधने यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या .'रयत' सचिव प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. प्रसिध्द व्याख्याते गणेश शिंदे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील, सकाळ प्रकाशनच्या संपादक दीपाली चौधरी यांच्यासह दुर्गाताई तांबे, निर्मला मालपाणी, हर्षदा काकडे, अॅड.शारदा लगड, अनुराधा नागवडे, मीनाक्षी साळूंके, डॉ.प्रेरणा दिघे - बाफना, रोहिणी लवांडे, डॉ.शारदा महांडुळे अंजली देवकर या पुस्तकातील 'कारभारणी' व्यासपीठावर होत्या.

जगधने म्हणाल्या "कारभारणी पुस्तक वाचताना मनामध्ये भावभावनांचे आंदोलन निर्माण झाले. स्त्री मनाचे पैलू यातून उलगडले असून, स्त्री रत्नाची खाण म्हणण्यापेक्षा नारीरत्नाची खाण असे संबोधने उचित ठरेल. सकाळ माध्यम समूह नेहमीच स्त्रियांच्या प्रश्नासाठी अग्रेसर असतो. 'सकाळ' ने स्त्रीप्रतिष्ठा अभियानातून महिलांना व्यासपीठ निर्माण करून देत त्यांच्या सक्षमीकरणासाठी यशस्वी प्रयत्न चालविलेले आहेत सकाळ प्रकाशनाने डॉ.बोठे पाटील यांच्या एकंदर आठ पुस्तकांची निर्मिती केली आहे. त्यापैकी सहाव्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ 'कारभारणी' च्या रूपाने आज पुस्तकातील कारभारणींचा त्याग, कष्ट, संघर्ष यांची प्रेरणा घेऊन महिलांनी रडगाणे गात न बसता आपल्या आवडत्या क्षेत्रात यशाची शिखरे गाठावित."

डॉ.कराळे यांनी कारभारणी पुस्तक खडतर परिस्थितीतून वाटचाल करणाऱ्यांना रोडमॅप ठरणार असल्याचे सांगितले. व्याख्याते शिंदे म्हणाले, "समाजाला उभे करण्याचे सामर्थ्य स्त्रीमध्ये आहे. पुस्तकातील कारभारणी स्वकर्तृत्वाने पुढे आल्या आहेत. त्यांच्या व्यक्तिचित्रणातून समाज घडविणाऱ्या कारभारणींची खाण निर्माण होईल. ग्रामीण शहाणपण असणारा माणूस असल्याने त्यांच्या लेखणीतून शब्दबध्द झालं." तांबे व दिघे - बाफना यांनीहीमनोगत व्यक्त केले.

पुस्तकाचे लेखक डॉ.बोठे पाटील यांनी प्रस्ताविकता पुस्तकांच्या निर्मितीचा हेतू विषद करीत सकाळच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा.डॉ.संजय नगरकर यांनी स्वागत केले सकाळ चे प्रिन्सिपल करस्पाडंट विठ्ठल लांडगे यांनी आभार मानले. सायली सुहास देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

या संपूर्ण प्रकाशन सोहळ्याचे फेसबुकवरून दोन तास थेट प्रक्षेपण झाले, त्याला देश - विदेशातून असंख्य लाईक्स कॉमेंट्स मिळाल्या.

## श्रमप्रतिष्ठा दिन साजरा



कर्मवीर जयंती सप्ताह श्रमप्रतिष्ठा करतांना प्रा.कातोरे एस.एस., प्रा.पायमोडे एस.के., प्रा.कातोरे बी.सी. व प्रा.सालके एस.के.

कर्मवीर जयंती सप्ताह निमित्त महाविद्यालयामध्ये सिनियर व ज्युनियर विभागातील सर्व सेवक व त्याच बरोबर कार्यालयीन सर्व सेवक व विद्यार्थिनी 22 सप्टेंबर हा यश्रमप्रतिष्ठा दिन साजरा केला. या वेळी परिसर स्वच्छताही करण्यात आली व त्यांचबरोबर विद्यार्थिनींना पाणी पिण्यासाठी खोदलेली पाण्याची टाकी यासाठी भराव काम याप्रसंगी करण्यात आले. प्रा.कातोरे एस. एस., प्रा.सालके एस. एस. व ज्युनियर विभागातील प्रा.पायमोडे एस. के., प्रा.कातोरे बी.सी. आदिनी यावेळी श्रमप्रतिष्ठा दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये काम केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयातील विविध ठिकाणी शिक्षक शिक्षकेत्तर सेवक विद्यार्थिनींनी काम केले.

## ग्रंथालयास प्रा. गफूर शेख यांची ग्रंथभेट



ग्रंथालयास संदर्भ ग्रंथ भेट देत असतांना प्रा.गफूर शेख व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील व ग्रंथपाल श्री.ज्ञानेश्वर शिंगाडे

विद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा.गफूर शेख यांनी ग्रंथालयास ऐतिहिसिक ग्रंथ भेट दिली प्रा. गफूर शेख यांनी इतिहासामध्ये संशोधनातलं लेखन केले आहे व त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संदर्भग्रंथ म्हणून मान्यता दिली आहे. संदर्भ ग्रंथांचा संच महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील व ग्रंथपाल श्री.ज्ञानेश्वर शिंगाडे यांनी भेट म्हणून स्वीकारला. विद्यार्थिंनीना अभ्यासा साठी या ग्रंथाचा उपयोग होईल असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी. पाटीलयांनी यावेळी सांगितले.

## रक्तदान जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन




रक्तदान जनजागृती रॅलीत सहभागी विद्यार्थिनी

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा रूग्णालय यांच्या संतुक्त विद्यमानाने शहरामध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले यावेळी विद्यार्थिनींनी संपूर्ण शहरातून फेरी काढली व जनतेमध्ये रक्तदान करण्याविषयी जागृतीही केली. विविध घोषणा व संदेश चित्रामार्फत हे प्रबोधन करण्यात आले या रॅली यशस्वी करण्यासाठी डॉ.संगिता कुलकर्णी प्रा.ज्योती जाधव, प्रा.शुभांगी ठुबे, डॉ.निकाळजे बी.एस. यांनी सहकार्य केले.

## डॉ.राजीव सूर्यवंशी यांचे 'अवयवदान' याविषयी व्याख्यान





आरोग्य विषयी मार्गदर्शन करतांना डॉ.राजीव सूर्यवंशी, डॉ.मैथिली गाडेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील

महाविद्यालयामध्ये डॉ.राजीव सूर्यवंशी यांनी विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी त्वचेची काळजी कशी घ्यावी व त्याचबरोबर आज अवयवदान केल्याने एखाद्या मानवाला नव संजीवनीही आपल्या अवयवदानामुळे शकते असे प्रतिपादन डॉ.राजीव सूर्यवंशी यांनी केले. त्याचबरोबर डॉ.मैथीली गाडेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.संगिता कुलकर्णी यांनी प्रयत्न केले.

## महाविद्यालयात आविष्कार स्पर्धेची कार्यशाळा संपन्न



आविष्कार कार्यशाळेत उद्बोधन करतांना डॉ.अभिजित कुलकर्णी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आविष्कार या संशोधन स्पर्धेची कार्यशाळा 10/10/2017 रोजी संपन्न झाली. विद्यार्थिनी मध्ये संशोधनाची आरढ निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी होणाऱ्या आविष्कार स्पर्धेचे आयोजन विद्यापीठामार्फत केले जाते. या वर्षी राधाबाई काळे महिला महाविद्यालयात केले जाणार आहे. त्या पूर्वी स्पर्धेमध्ये कोणत्या पध्दतीने प्रकल्प सादर केले जावेत कशा पध्दतीने प्रकल्प सादर केले जावे याविषयी अहमदनगर महाविद्यालयातील डॉ. अभिजीत कुलकर्णी यांनी उद्बोधन केले. स्पर्धेचे समन्वय प्रा. डॉ. हेमंत अकोलकर यांनी प्रास्तविक केले. तर प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले या कार्यशाळेत 150 विद्यार्थी सहभागी झाले होते.

# डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांना अभिवादन



भूतपूर्व राष्ट्रपती व अणुसंशोधनाचे पितामह डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती महाविद्यालयात संपन्न झाली. डॉ.कलाम यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील यांनी व सर्व सहकारी शिक्षक, शिक्षकेतर सेवक तसेच विद्यार्थिनी यांनी अभिवादन केले.

# महाविद्यालयात कवितेची कार्यशाळा



विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना कवी डॉ.बाळासाहेब लबडे, कवी संजय बोरूडे, डॉ.संजय नगरकर

विद्यार्थिनीच्या सृर्जनशीलतेला वाव मिळावा म्हणून महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने कवीतेची कार्यशाळा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत गुहागर (जिल्हा रत्नागिरी) येथील प्रख्यात कवी डॉ. बाळासाहेब लबडे व अहमदनगर येथील प्रख्यात कवी संजय बोरुडे यांच्या कवितेची निर्मिती प्रक्रिया कवितेचे वाचन, लेखन, गायन या विषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन झाले. प्रा. लबडे यांनी कोकणी भाषेतील कविता, अभंग सदृश कविता व मुंबईची महानगरी कविता विद्यार्थिनीसमोर सादर केली. तर कवी संजय बोरुडे यांनी ग्रामीण भागातील स्त्रियांच्या वेदना आपल्या कवितेतून मांडल्या. या कार्यशाळेत महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. संजय नगरकर यांनी केले आभार विभाग प्रमुख प्रा. रामचंद्र राऊत यांनी मानले व सूत्र संचलन प्रा. सचिन कोतकर यांनी केले.

# वाचनप्रेरणा दिनानिमित्त परिसंवादाचे आयोजन



परिसंवादामध्ये सहभागी विद्याथिनी व प्राध्यापक

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले. वाचन हीच प्रेरणा या विषयावर झालेल्या परिसंवादात विभागातील दहा विद्यार्थिनी व तीन प्राध्यापक सहभागी झाले होते. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील होते. दीड तासाहून अधिक चाललेल्या परिसंवादात विद्यार्थिनींनी वाचनाचे महत्त्व तसेच जगातील सर्व यशस्वी व्यक्तींच्या यशामध्ये ग्रंथांचा अनमोल वाटा असल्याचे सांगितले तसेच समाजमाध्यमाच्या वाढत्या आक्रमनामुळे वाचन संस्कृतीवर कोणकोणते परिणाम होत आहेत. याविषयी विद्यार्थिनींनी सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी मते मांडली. सुजान व सजग नागरिक घडायचे असेल तर विचारांचा पाया पक्का असावा त्यासाठी वाचन हीच प्रेरणा असल्याचा निष्कर्ष या परिसंवादातून निघाला. प्रारंभी प्रा.डॉ. संजय नगरकर यांनी परिसंवादामागील भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर झालेल्या चर्चेत उपप्राचार्य प्रा.डॉ.भाऊसाहेब औटी, प्रा.गफूर शेख, विभाग प्रमुख प्रा. रामचंद्र राऊत, प्रा. सचिन कोतकर, कु.प्रियंका कराळे, कु. गितांजली खाडे, कु. प्रगति मिसाळ, कु. प्राची कुसळे, कु. भारती झिने, कु. किरण सहानी, कु. विक्रांती सोनवने या विद्यार्थिनींनी आपआपल्या भूमिका अभ्यासपूर्वक पद्धतीने मांडल्या. परिसंवादाच्या शेवटी अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीनानाथ पाटील यांनी वाचन संस्कृतीचा संपूर्ण इतिहास संदर्भासह मांडला व उद्याच्या जगात आपल्याला जगायचे असेल तर वाचण्या शिवाय पर्याय नसल्याचे सांगितले.

# महाविद्यालयाच्या शास्त्र शाखेची शैक्षणिक सहल कळसुबाई शिखरावर



कळसुबाईचे शिखर चढतांना विद्यार्थीनी

राधाबाई काळे महिला महाविद्यालयाच्या शास्त्र शाखेची शैक्षणिक सहल नूकतीच कळसुबाई शिखर - भंडारडरा - अकोले परिसरात जाऊन आली. या सहलीमध्ये 39 विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. सह्याद्रीच्या डोंगर रांगातील या परिसरातून विद्यार्थिनींनी अनेक दुर्मिळ वनस्पतींचे नमुने संकलीत केले. तसेच या परिसरातील, पक्षी, प्राणी, किटकांचे, निरीक्षण केले. विद्यार्थिनींना वनस्पतींशास्त्राच्या डॉ. संगिता कुलकर्णी व प्राणिशास्त्राच्या डॉ. सुमन पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनीचे व्याख्यान सत्र संपन्न

अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांचे ज्ञान अद्ययावत राहावे तसेच ज्ञानाची देवान घेवान व्हावी म्हणून प्राध्यापक प्रबोधिनी कार्यरत असून या प्रबोधिनी अंतर्गत ग्रंथपाल डी.आय.शिंगाडे यांचे ई-लर्निंग अंतर्गत ऑनलाईन पुस्तके ग्रंथालय व संदर्भसाधनाचा शोध कसा घ्यावा याविषयी मौलिक मार्गदर्शन केले. तसेच तिसऱ्या वेळी नॅकला सामोरे जाताना कोणकोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे या विषयी प्रा.एस.डी.घंघाळे यांनी मार्गदर्शन केले. प्राध्यापक प्रबोधिनीचे प्रमुख प्राध्यापक गफूर शेख, प्रा.योगेश तवर आदिंनी परिश्रम घेतले.

# सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना विद्यार्थिनींनी बसावे - प्रशांत गांधले (आयकर अधिकारी)



स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करतांना मा.प्रशांत गांधले (आयकर उपायुक्त अहमदनगर) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख डॉ.संजय नगरकर

स्पर्धा परीक्षा हे आव्हान नव्हे तर संधी समजून विद्यार्थिनींनी सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना बसावे कारण विद्यार्थिनींना या क्षेत्रात खूप संधी असून नियोजनबद्ध अभ्यास व सातत्याने तयारी केल्यास यश हमखास मिळते. असे प्रतिपादन आयकर अधिकारी प्रशांत गांधले यांनी केले राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील विद्यार्थिनीसमोर ते बोलत होते यावेळी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील उपस्थित होते. याप्रसंगी पुढे मार्गदर्शन करताना मा.गांधले म्हणाले, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करण्यापूर्वी विद्यार्थिनींनी आता पासूनच निवड मंडळ यासारख्या परीक्षांना बसावे तसेच विद्यार्थिनींनीसाठी या क्षेत्रामध्ये राखीव जागाा व कमी मिरीट यामुळे यश लवकर मिळते. फक्त प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक असते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य.डॉ.दिनानाथ पाटील यांनी महाविद्यालयाने स्पर्धा परीक्षांसाठी सर्वतोपरी सुविधा प्राप्त करुन दिलेल्या आहेत. त्याचा लाभ घेऊन अभ्यासाची तयारी करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.संजय नगरकर यांनी केले. आभार प्रा.अमोल बुचुडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.योगेश तवर यांनी केले.

दि प्रेस ॲण्ड रेजिस्ट्रेशन ऑफ बुक्स
नियम ८ फॉर्म नं. ९ नुसार
सदर वार्तापत्र हे खासगी वितरणासाठी असून स्वप्नील प्रिंटर्स यांचेकडून २०० अंक मुद्रीत केले आहेत.
प्रकाशन हक्क : प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील,
मुद्रण : स्वप्नील प्रिंटर्स, अ.नगर ७२७६००५४०९

# महात्मा गांधी पुतळा परिसर दोन तासांत चकाचक





महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता करतांना महाविद्यालयातील विद्यार्थिनी, महानगरपालिकेचे नगरसेवक व प्राध्यापक सेवक

वाडिया पार्क मैदान समोरिल महात्मा गांधी पुतळा परीसरात व समोरील रस्त्यांवर राधाबाईकाळे महिला महाविद्यालय YIN च्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महापालिकेच्या सहकार्याने राबविलेल्या या अभियाना अंतर्गत त्या भागातील रस्ते चकाचक झाले त्या बद्दल नगरकरांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनिंना धन्यवाद दिले महात्मा गांधी जयंती निमित्त हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले या प्रसंगी डॉ.संजय नगरकर, प्रा.शुभांगी ठुबे, प्रा.फातिमा अंबेकर आदी सहकार्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# स्वच्छ व सुंदर महाविद्यालय



महाविद्यालयामधील ओला व सुका कचरा वेगळा करण्याबाबत जागृती करतांना विद्यार्थिनी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील, डॉ.भाऊसाहेब औटी, श्री.राजेंद्र शेटे व डॉ.संगिता कुलकर्णी

शहरातील एकमेव महिला महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या राधाबाई काळे महिला महाविद्यालय म्हणुन ओळखले जाते. परिसरामधिल कचरा संकलन करण्यासाठी ओला व सुका कचरा असो स्वरूपा मध्ये तो गोळा केला जातो तोच कचरा एकत्र करून खत व गॅस निर्मिती ही केली जाते. महाविद्यालया मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना अंतर्गत एकूण 45 विद्यार्थिनी या स्वच्छातेसाठी श्रम करतात व त्याच बरोबर महाविद्यालयातिल विद्यार्थिनी सुद्धा कचरा हा नियोजित ठिकाणीच टाकतात व सुंदर व स्वच्छ महाविद्यालय यामुळे एक वेगळी ओळख ही महाविद्यालयाची होते आहे. या संकल्पनेला मूर्तरूप देण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील व उपप्राचार्य भाऊसाहेब औटी यांचे वेगवेगळे उपक्रम या बाबत असतात. कॉलेजच्या कँटिन जवळ वेस्ट फुड पासुन बायोगॅसनिर्मिती करण्यासाठी प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. त्यामुळे कचरा हा पूर्णपने नष्ट करून महाविद्यालयामध्ये त्याची नवनिर्मिती प्रक्रिया केली जाते.

# रचनात्मक विकासाची पाहणी



महाविद्यालयाच्या विकास समितीचे चेअरमन मा.आशुतोषजी काळे यांनी नुकतीच महाविद्यालयाच्या रचनात्मक विकासाची पाहणी करण्यासाठी भेट दिली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील त्यांना विकासात्मक कामाची माहिती देत आहेत.